# राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती
संभाजीनगर,बचत भवन लेखा व कोषागार
कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर
-४३१००१

**तक्रार क्र. १३८९/२०१८/नांदेड**
**(द्वितीय अपील क्र.१११६/२०१७मध्ये)**

श्री. भाऊसाहेब मरीबा वाघमारे, : तक्रारदार
मु.पो.माळेगाव (यात्रा),ता.लोहा,जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वन परिक्षेत्र अधिकारी,(प्रादेशिक),मुखेड,जि.नांदेड

**निर्णय**

**(सुनावणी दि.०७.११.२०२३ )**

तक्रारदार यांनी दि.२०.१२.२०१८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

"तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे

आपण पारित केलेल्या आदेशात असे म्हटले होते की, १५ दिवसाच्या आत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी पण मला अदयाप माहिती दिली नाही जन माहिती अधिकारी यांनी दुष्ट क्रुरबुध्दीने माहिती देण्यास स्पष्ट नकार दिला आहे."

सदर आदेशाची अंमलबजावणी केली नाही, अशी तक्रार करुन संबंधितावर कलम २०(१) (२) नुसार शिस्तभंग व दंडात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

आयोगाने द्वितीय अपील क्र.१११६/२०१७ मध्ये दि.०९.०१.२०१८रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले होते.

"वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२७.१०.२०१६ रोजीच्या जोडपत्र "अ" मध्ये नमुद व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती संकलीत करुन आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. असा आदेश दिला आहे. "

सदर प्रकरणावर यापूर्वी दि.१३.०६.२०२३रोजी सुनावणी झाली, सदरील सुनावणीला सर्व अनुपस्थित असल्यामुळे सदरील प्रकरणात सुनावणी परिपूर्ण होण्यासाठी आज दि.०७.११.२०२३ रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे.

श्री.ए.बी.रासने,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक),मुखेड जि.नांदेड आणि श्री.एस.डी.हराळ,विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,(प्रादेशिक),मुखेड जि.नांदेड यांना दि.०३.०८.२०२३रोजी सुनावणीला उपस्थित राहण्यासाठी व माहिती देण्यात आली व कसे याबाबतचा खुलासा सादर करण्यासाठी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली, त्यानुसार श्री.एस.डी.हराळ,विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,(प्रादेशिक),मुखेड जि.नांदेड दि.०४.०९.२०२३

रोजी त्यांनी खुलासा सादर केला.त्यामध्ये त्यांनी कथन केले की, नांदेड ते औरंगाबाद प्रवासा दरम्यान वाहन नादुरुस्त झाल्याने सुनावणीस उशिरा झाल्याने उपस्थिती लागली नाही. सदर प्रकरणात वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे,

१) प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेश क्र.२०१६/मा.अ.अ.२००५/मग्रारोहयो/सिआर दि.१२.०७.२०१७ माहिती अधिनियमचे अवलोकन केले असता हे प्रकरण लागवड अधिकारी सामाजिक वनीकरण परिक्षेत्र लोहा यांचे बाबत आहे. या बाबतची त्यांनी तक्रारदार यांना माहिती दिली किंवा नाही याबाबत या कार्यालयात अभिलेखे उपलब्ध नसल्यामुळे हि माहिती संदर्भीय क्र.०६दि.१४.०६.२०२३ अन्वये तक्रारदारास देण्याचे कळविण्यात आले आहे. २)मौजे माळेगाव (यात्रा) हे गाव सन २००८ ते २००९ पर्यंत वनपरिक्षेत्र (प्रादेशिक) मुखेड अंतर्गत होते व या कालावधीत सदर गावात कुठलेही काम न झाल्यामुळे सदरची माहिती निंरक आहे. संदर्भिय क्र.०८ दि.३१.०८.२०२३ नुसार तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली आहे. व २००९ ते दि.१४.०६.२०२३ अन्वये तक्रारदारास देण्याचे कळविण्यात आले आहे.सदर वस्तुस्थितीनुसार सादर केलेला कारणे दाखवा नोटीसीची खुलासा मान्य करुन जन माहिती अधिकारी वनपरिक्षेत्र (प्रा.) मुखेड यांच्यावर कुठलीही दंडात्मक कार्यवाही करण्यात येवु नये ही नम्र विनंती, केली आहे. त्यांच्या लेखी खुलाश्यामध्ये तथ्यांश दिसून येत आहे.

श्री.ए.बी.रासने, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक), मुखेड जि.नांदेड यांनी कोणताही प्रकारचा खुलासा सादर केला नाही.

आज दिनांक ०७.११.२०२३रोजी सुनावणीस श्री.एस.डी.हराळ,विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,(प्रादेशिक),मुखेड जि.नांदेड हे उपस्थित आहेत तर श्री.ए.बी.रासने,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक), मुखेड जि.नांदेड (सध्या वनपरिक्षेत्र अधिकारी,सामाजिक वनीकरण पूर्णा,जि.परभणी येथे कार्यरत) हे कोणतीही पूर्व परवानगी न घेता अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी श्री.एस.डी.हराळ,विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,(प्रादेशिक),मुखेड जि.नांदेड यांनी सुचित केले की, दि.४.०९.२०१८ रोजी आयोगाचे व्दितीय अपील निर्णय प्राप्त झाल्यानतंर श्री.ए.बी.रासने,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक), मुखेड जि.नांदेड (सध्या वनपरिक्षेत्र अधिकारी,सामाजिक वनीकरण पूर्णा,जि.परभणी येथे कार्यरत) यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही.तसे अभिलेख/पुरावे आढळून आले नाहीत.

श्री.ए.बी.रासने,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक),मुखेड जि.नांदेड (सध्या वनपरिक्षेत्र अधिकारी,सामाजिक वनीकरण पूर्णा,जि.परभणी येथे कार्यरत) यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी दि.०३.०८.२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस उपवनसंरक्षक,वन विभाग,नांदेड यांच्या मार्फत देण्यात आली परंतु त्यांनी त्यांचा खुलासा आयोगाला सादर केला नाही;व तसेच आज दि.०७.११.२०२३ रोजीच्या सुनावणीसाठी कोणतीही पूर्व परवानगी न घेता ते गैरहजर राहिले आहेत. यावरुन त्यांना या प्रकरणात काहीही म्हणायचे नाही असे दिसून येत आहे. त्यामुळे या कृतीवरुन ते स्वत:हुन शिक्षेसाठी पात्र ठरत आहे.

त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात, आयोगाने आदेशित करुनही माहिती न देणे, आयोगाच्या आदेशाची अवहेलना करणे, अशा बाबी माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायदयाच्या उल्लंघन करणा-या ठरतात. या प्रकरणी श्री.ए.बी.रासने,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,(प्रादेशिक),मुखेड जि.नांदेड (सध्या वनपरिक्षेत्र अधिकारी,सामाजिक वनीकरण पूर्णा,जि.परभणी येथे कार्यरत) यांनी अशा सर्व कृती करुन अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस स्वत:ला पात्र ठरविलेले आहे. त्यामुळे श्री.ए.बी.रासने,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,(प्रादेशिक),मुखेड जि.नांदेड (सध्या वनपरिक्षेत्र अधिकारी,सामाजिक वनीकरण पूर्णा,जि.परभणी येथे कार्यरत)

यांना याप्रकरणी रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती अंतिम करण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

प्रस्तुत प्रकरणात वर नमुद केल्याप्रमाणे जबाबदार श्री.ए.बी.रासने,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,(प्रादेशिक),मुखेड जि.नांदेड (सध्या वनपरिक्षेत्र अधिकारी,सामाजिक वनीकरण पूर्णा,जि.परभणी येथे कार्यरत) यांचेकडुन शास्तीची रक्कम वसूल करून ती खालील लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करण्याची जबाबदारी माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (८) (क) व १९ (७) अन्वये मुख्य वनसंरक्षक,प्रादेशिक वन विभाग,छत्रपती संभाजीनगर यांचेवर निश्चित करण्यात येत आहे.

**लेखाशिर्ष** :- **००७०- इतर प्रशासनिक सेवा**
**६०- इतर सेवा**
**८००- इतर जमा रक्कम**
**१८- माहितीचा अधिकार ००७०-००६-१**

वर नमुद केल्याप्रमाणे शास्तीची वसुली मुख्य वनसंरक्षक,प्रादेशिक वन विभाग,छत्रपती संभाजीनगर यांनी करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त विवेचनानुसार श्री.ए.बी.रासने,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,(प्रादेशिक),मुखेड,जि.नांदेड (सध्या वनपरिक्षेत्र अधिकारी,सामाजिक वनीकरण पूर्णा,जि.परभणी येथे कार्यरत) यांना या प्रकरणी रु.२५,०००/-इतकी शास्ती करण्यात येत आहे. तसेच सदर शास्तीची रक्कम वसूल करुन उपरोक्त दिलेल्या लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करण्याची जबाबदारी माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (८) (क) व १९(७) अन्वये मुख्य वनसंरक्षक,प्रादेशिक वन विभाग,छत्रपती संभाजीनगर यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे. यानुसार तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

तक्रार क्र.१३८९/२०१८/नांदेड/ एबीजे/जावक क्र. 19628 दि. ~~26/12/2023~~ 26/12/2023

प्रत: माहिती तथा कार्यवाही/अंमलबजावणीस्तव अग्रेषित.

१. श्री.ए.बी.रासने,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक),मुखेड,जि.नांदेड (सध्या वनपरिक्षेत्र अधिकारी,सामाजिक वनीकरण पूर्णा,जि.परभणी येथे कार्यरत) यांना मार्फत:-मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक वन विभाग,छत्रपती संभाजीनगर
२. मुख्य वनसंरक्षक,प्रादेशिक वन विभाग,छत्रपती संभाजीनगर